जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
सकाळ



डॉ. हांगिरगेकर



अक्षय गुरव



ललित भोसले

# बायोमासपासून औषध निर्माणसाठी उपयुक्त संयुगांची निर्मिती

## विद्यापीठाच्या संशोधकांना आंतरराष्ट्रीय यूके पेटंट

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषध निर्माण क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असणाऱ्या संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला यूकेचे पेटंट प्राप्त झाले आहे. प्रतिजैविके व कर्करोगावरील चाचण्यांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर, अक्षय गुरव, ललित भोसले या संशोधकांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या शोधाला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे.

या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला. या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. बायोमासपासून निर्मित फाईव्ह-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल (एचएमएफ) याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून संशोधकांनी औषध निर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रहच तयार केला आहे. हे संशोधन औषध निर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले आहे. पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या पद्धतीच्या वापरामुळे शाश्वत विकासाला चालना मिळेल तसेच हा शोध हरित संशोधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे मत डॉ. हांगिरगेकर यांनी व्यक्त केले.

### संशोधनाचे महत्त्व ...

- 'जैव-नवीकरणीय स्रोतांपासून प्राप्त होणाऱ्या संयुगांमध्ये एचएमएफ हे महत्त्वाचे जैव-आधारित रासायनिक मध्यवर्ती असते. लिग्नोसेल्युलोसिक बायोमास आणि अन्न कचऱ्यापासून ते उपलब्ध होऊ शकते. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून, रासायनिक प्रक्रिया अधिक शाश्वत करण्यासाठी एचएमएफसारख्या बायोमास-आधारित संयुगांचा वापर करणे महत्त्वाचे ठरते. त्यापासून तयार केलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संशोधन क्षेत्रात अँटी-बॅक्टेरियल, ऑक्सिडंट आणि कॅन्सर या चाचण्यांसाठी उपयोग झाला आहे. अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी हे महत्त्वपूर्ण ठरू शकते', असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.


18 OCT 2024
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बायोमासपासून औषधनिर्माण संयुग निर्मितीला युकेचे पेटंट


प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषधनिर्माण क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला यूकेचे पेटंट प्राप्त झाले आहे. प्रतिजैविके व कर्करोगावरील चाचण्यांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे. या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून संशोधकांचे अभिनंदन करण्यात आले.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर आणि अक्षय गुरव व ललित भोसले या संशोधकांनी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री वापरुन बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या



डॉ. शंकर हांगिरगेकर, अक्षय गुरव



ललित भोसले

शोधाला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे.

डॉ. हांगिरगेकर म्हणाले, या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला. या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. बायोमासपासून निर्मित

- **शिवाजी विद्यापीठ प्रशासनाकडून अभिनंदन**

फाईव्ह–हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून संशोधकांनी औषधनिर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रहच तयार केला आहे.

हे संशोधन औषधनिर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले असून पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन क्षेत्रातील नवकल्पना आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या विकासासाठीची वचनबद्धता या यशातून अधोरेखित होते. या पद्धतीच्या वापरामुळे शाश्वत विकासाला चालना मिळेल तसेच हा शोध हरित संशोधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे मत डॉ. हांगिरगेकर यांनी व्यक्त केले.

18 OCT 2024
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बायोमासपासून औषध निर्माणसाठी संयुग निर्मिती

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना आंतरराष्ट्रीय यूके पेटंट प्राप्त

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषध निर्माण क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असणाऱ्या संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळवले आहे. त्यांच्या या संशोधनाला यूकेचे पेटंट प्राप्त झाले आहे. प्रतिजैविके व कर्करोगावरील चाचण्यांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे.



डॉ. शंकर हांगिरगेकर, अक्षय गुरव, ललित भोसले

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर आणि अक्षय गुरव व ललित भोसले या संशोधकांनी ग्राईंडस्टोन केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या शोधाला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे.

डॉ. हांगिरगेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राईंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला. या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही

उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. बायोमासपासून निर्मित फाईव्ह-हायड्रॉक्सी मियाईल फुरफुराल याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून संशोधकांनी औषध निर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रहच तयार केला आहे.

### संशोधनाचे महत्त्व असे...

जैव-नवीकरणीय स्रोतांपासून प्राप्त होणाऱ्या संयुगांमध्ये ५-हायड्रॉक्सी मिथाईल फुरफुराल हे महत्त्वाचे जैव-आधारित रासायनिक मध्यवर्ती असते. लिग्नोसेल्युलोसिक बायोमास आणि अन्न कचऱ्यापासून ते सहज उपलब्ध होऊ शकते. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून, रासायनिक प्रक्रिया अधिक शाश्वत करण्यासाठी ५-हायड्रॉक्सी मिथाईल फुरफुराल यासारख्या बायोमास आधारित संयुगांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. त्यापासून तयार केलेल्या हायड्राझिनिल थायाझोल या रसायनाचा संशोधन क्षेत्रात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-कॅन्सर या चाचण्यांसाठीही उपयोग झाला आहे. हायड्राझिनिल थायाझोलचे संशोधन औषध उत्पादनात मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरले आणि त्यांचे औषधी फायदेही आढळले आहेत. अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी हे महत्त्वपूर्ण ठरू शकते, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

18 OCT 2024

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बायोमासपासून औषधनिर्माण क्षेत्रासाठी उपयुक्त संयुगांची निर्मिती



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषधनिर्माण क्षेत्रासाठी अत्यंत उपयुक्त असणाऱ्या संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले आहे. त्यांच्या या संशोधनाला युकेचे पेटंट प्राप्त झाले आहे. प्रतिजैविके व कर्करोगावरील उपचारांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर आणि अक्षय गुरव व स्वप्निल भोसले या संशोधकांनी ग्रीन केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्सी मिथाईल फुरफुरल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या शोधाला संयुक्त राष्ट्रांचे (युके) प्रतिष्ठित पेटंट मिळाले आहे.

डॉ. हांगिरगेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला. विशेष म्हणजे, या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले. बायोमासपासून निर्मित फाईव्ह-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून संशोधकांनी औषधनिर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रह तयार केला आहे. हे संशोधन औषधनिर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले असून पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन क्षेत्रातील नावकल्पना आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या विकासासाठीची वचनबद्धता या वरून अधोरेखित होते. या पद्धतीच्या वापरामुळे शाश्वत विकासाला चालना मिळेल तसेच हा शोध हरित संशोधनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, असे मत डॉ. हांगिरगेकर यांनी व्यक्त केले.

**संशोधनाचे महत्त्व असे...**

जैव-नविकरणीय स्रोतांपासून प्राप्त होणाऱ्या संयुगांमध्ये 5-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल (HMF) हे महत्त्वाचे जैव-आधारित रासायनिक मध्यवर्ती असते. लिग्नोसेल्युलोसिक बायोमास आणि अन्न कचऱ्यापासून ते सहज उपलब्ध होऊ शकते. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून, रासायनिक प्रक्रिया अधिक शाश्वत करण्यासाठी 5-हायड्रॉक्सीमिथाइलफुरफुराल (HMF) सारख्या बायोमास-आधारित संयुगांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. तसेच, त्यापासून तयार केलेल्या हायड्राझिनिल थायाझोल या रसायनाच्या संशोधन क्षेत्रात अँटी-बॅक्टेरियल, अँटी-ऑक्सिडंट आणि अँटी-कॅन्सर या चाचण्यांसाठी देखील उपयोग झाला आहे. हायड्राझिनिल थायाझोलचे संशोधन औषध उत्पादनात मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरले आहे आणि त्याचे औषधी फायदेदेखील आढळले आहेत. अन्न सुरक्षा आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी हे महत्त्वपूर्ण ठरू शकते, असे डॉ. हांगिरगेकर यांनी सांगितले.

18 OCT 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांना यूके पेटंट

# बायोमासपासून औषध निर्माण क्षेत्रासाठी संयुगांची निर्मिती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधकांनी बायोमासपासून औषध निर्माण क्षेत्रासाठी उपयुक्त संयुगांची निर्मिती करण्यात यश मिळविले. त्यांच्या या संशोधनाला यूकेचे पेटंट प्राप्त झाले. प्रतिजैविके व कर्करोगावरील चाचण्यांमध्ये त्यांचे उपयोजन शक्य आहे.

विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. शंकर हांगिरगेकर, अक्षय गुरव व ललित भोसले या संशोधकांनी ग्राइंडस्टोन


डॉ. शंकर हांगिरगेकर


अक्षय गुरव


ललित भोसले

केमिस्ट्री वापरून बायोमासपासून हायड्रॉक्झी मिथाईल फुरफुराल हे मूलद्रव्य वापरून नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्याची पद्धती शोधली आहे. या शोधाला संयुक्त राष्ट्रांचे (यूके) प्रतिष्ठित पेटंट मिळाले.

या संशोधनात नवीन हायड्राझिनिल थायाझोल संयुगे तयार करण्यासाठी ग्राइंडस्टोन केमिस्ट्री या अत्यंत सोप्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीचा वापर करण्यात आला. विशेष म्हणजे, या नव्या पद्धतीमध्ये कोणत्याही उत्प्रेरकाचा किंवा द्रावणाचा वापर न करता कमी वेळेत उत्कृष्ट उत्पादन मिळवता आले.

### काय आहे संशोधनाचे महत्त्व

- जैव-नवीकरणीय स्रोतांपासून प्राप्त होणाऱ्या संयुगांमध्ये ५-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल हे महत्त्वाचे जैव-आधारित रासायनिक मध्यवर्ती असते.
- लिग्नोसेल्युलोसिक बायोमास आणि अन्न कचऱ्यापासून ते सहज उपलब्ध होऊ शकते.
- पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून, रासायनिक प्रक्रिया अधिक शाश्वत करण्यासाठी ५-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुरालसारख्या बायोमास-आधारित संयुगांचा वापर करणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे.

बायोमासपासून निर्मित फाईव्ह-हायड्रॉक्सी मिथाइल फुरफुराल याचा महत्त्वपूर्ण घटक म्हणून वापर करून संशोधकांनी औषधनिर्माण क्षेत्रात उपयुक्त असलेल्या हायड्राझिनिल थायाझोल संयुगांचा संग्रहच तयार केला आहे. हे संशोधन औषधनिर्माण क्षेत्रासाठी अभिनव ठरले असून, पर्यावरणपूरक रसायनशास्त्रातील एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे क्षेत्रातून सांगितले जात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
सकाळ

# महर्षी वाल्मीकी जयंती कार्यक्रम विद्यापीठात

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठात आज महर्षी वाल्मीकी जयंती साजरी करण्यात आली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये महर्षी वाल्मीकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, पर्यावरण अधिविभाग प्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. पल्लवी भोसले, रचना इंगवले उपस्थित होते.

18 OCT 2024

हॅलो प्रभात

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'तेंडल्या' चित्रपटाचे शनिवारी विद्यापीठात स्क्रीनिंग

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म कोर्सच्या वतीने दि. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत सचिन जाधव आणि नचिकेत वायकर दिग्दर्शित 'तेंडल्या' या राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटाचे स्क्रीनिंग आयोजित करण्यात आले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या मानव्य शास्त्र सभागृहामध्ये हे स्क्रीनिंग होणार असून सर्वांसाठी ते खुले आहे.

'तेंडल्या' चित्रपटाला बेस्ट ऑडिओग्राफी नॅशनल अवॉर्ड त्याचबरोबर महाराष्ट्र स्टेट बेस्ट डेब्युट डिरेक्टर आणि बेस्ट डेब्युट ॲक्टर, बेस्ट फिल्म, बेस्ट चाईल्ड आणि बेस्ट एडिटर अवॉर्डने गौरवण्यात आले आहे.

स्क्रीनिंग नंतर दिग्दर्शक सचिन जाधव चित्रपटाचो निर्मिती प्रक्रिया या विषयावर संवाद साधणार आहेत. सर्वांनी या स्क्रीनिंगमध्ये आणि त्यानंतरच्या चर्चेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन आणि बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
पुण्यनगरी

# 'तेंडल्या' चित्रपटाचे उद्या स्क्रीनिंग

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म कोर्सच्या वतीने दि. १९ रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत सचिन जाधव आणि नचिकेत वायकर दिग्दर्शित 'तेंडल्या' या राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपटाचे स्क्रीनिंग आयोजित केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये होणारे स्क्रीनिंग सर्वांसाठी खुले आहे. त्यानंतर दिग्दर्शक सचिन जाधव चित्रपटाची निर्मिती प्रक्रिया या विषयावर संवाद साधणार आहेत. या चर्चेत सहभागी व्हावे, असे आवाहन मास कम्युनिकेशन आणि बी.ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2021
पुढारी

# ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन व संवर्धन कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत नाईट कॉलेज येथे इतिहास विभागाच्या वतीने 'ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन व संवर्धन' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी डॉ. विश्वनाथ मगदूम होते.

कॉमर्स कॉलेजचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एस. नाईक यावेळी प्रमुख उपस्थित होते. कार्यशाळेत पुरालेखाधिकारी गणेश खोडके यांनी 'कागदपत्रे : जतन व संवर्धन' या विषयावर, प्रा. चंद्रशेखर काटे यांनी ऐतिहासिक कागदपत्रांचे जतन व संवर्धनाच्या आधुनिक पद्धतींबद्दल मार्गदर्शन केले.

शस्त्र अभ्यासक अजय चौगुले यांनी ऐतिहासिक वस्तू आणि शस्त्र जतन व संवर्धन याचे प्रात्यक्षिक दाखवले. प्र. प्राचार्य डॉ. सुरेश फराकटे यांनी प्रास्ताविक केले.

पाहुण्याची ओळख प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी करून दिली. विभागप्रमुख प्रा. शंकर पवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुमन कांबळे यांनी केले. यावेळी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
तरुण भारत

# जीवनात यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य महत्त्वाचे

- पुणे येथील यशदाचे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजचे हे जग निव्वळ स्पर्धेचे नसून ते संवाद कौशल्य, सादरीकरण, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनविषयक ज्ञान मिळविण्याचे आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी ते आत्मसात केले पाहिजे. सकारात्मक विचाराने प्रेरित होऊन अभ्यासात सातत्य, जिद्द, चिकाटी आणि कष्ट केल्यास यशप्राप्ती शक्य आहे, असे प्रतिपादन पुणे येथील 'यशदा'चे संशोधन अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मानव्यशास्त्र सभागृहात 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती.



शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. बबन जोगदंड.

डॉ. जोगदंड म्हणाले, परीक्षार्थींनी राजहंसाप्रमाणे नीर–क्षीर विवेकवृत्तीने आवश्यक तेच ज्ञान प्राशन करण्याची कला आत्मसात करणे अनिवार्य ठरते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भिती आणि न्यूनगंड बाळगता कामा नये.

यावेळी स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. पवन कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
लोकमत

# विश्वकोश निर्मिती मंडळावर डॉ. शिंदे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. रणधीर शिंदे यांची महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या सदस्यपदी निवड झाली. सरकारच्या मराठी भाषा विभागाने मंडळाची पुनर्रचना केली असून यात अध्यक्ष, उपाध्यक्षासह २५ जणांचा नव्याने समावेश केला आहे. यात डॉ. शिंदे यांची सदस्यपदी निवड केली. शिंदे हे पहिल्यांदाच मंडळावर गेले आहेत. विद्यापीठातील मराठी विभागात गेल्या १८ वर्षांपासून कार्यरत असणारे डॉ. शिंदे हे मराठीतील प्रसिद्ध समीक्षकही आहेत. विश्वकोश निर्मिती मंडळाच्या मराठी साहित्य ज्ञानमंडळाचे समन्वयक म्हणूनही त्यांनी याआधी काम पाहिले आहे.

अभिलेखागार कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
लोकमत

# कलाप्रबोधिनी महाविद्यालयास नॅकचे बी प्लस श्रेणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नागाळा पार्क येथील शिवाजी विद्यापीठ संलग्नित कलाप्रबोधिनीज इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनला 'नॅक'कडून बी प्लस श्रेणी प्रदान केली आहे. महाविद्यालयाने पुनर्मूल्यांकनासाठी नोव्हेंबर २०२३ मध्ये नॅकला स्वयंअध्ययन अहवाल सादर केला होता. यानंतर २४ आणि २५ सप्टेंबरला परीक्षण समितीने प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली होती.

मूल्यांकन समितीचे अध्यक्ष प्रो. संदीप दुवा, सदस्य मधुमिता रॉय, सदस्य डॉ. चंद्रशेखर रेड्डी यांनी महाविद्यालयांच्या भौतिक सुविधांची पाहणी केली होती तसेच माजी विद्यार्थ्यांशीही संवाद साधला होता. त्यानुसार महाविद्यालयाला 'बी प्लस श्रेणी' देण्यात आली आहे. पुनर्मूल्यांकनासाठी संस्थेचे अध्यक्ष आर्कि. विजय गजबर, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त, प्राचार्य आर्कि. गिरीजा कुलकर्णी , विश्वस्त आर्कि. जयंत बेगमपुरे तसेच महाविद्यालयीन सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ,माजी विद्यार्थी, पालक तसेच संस्थेची संबंधित असणारे इतर सर्व घटकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
तरुण भारत

# हिवाळी सत्रातील प्रथम सत्र परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर /नोव्हेंबर २०२४ मधील हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे. विनाविलंब शुल्कासहित विद्यार्थ्यांना १८ ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरता येईल. विलंब शुल्कासह १ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरता येईल. अतिविलंब शुल्कासह ९ ते १२ नोव्हेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावयाचा आहे. तसेच महाविद्यालय व अधिविभागांनी परीक्षा अर्जांच्या याद्या विनाविलंब शुल्कासह ३१ ऑक्टोबरपर्यंत, विलंब शुल्कासह ८ नोव्हेंबर तर अतिविलंब शुल्कासह १३ नोव्हेंबरपर्यंत परीक्षा विभागाला सादर करायचा आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 OCT 2024
सकाळ

# विद्यापीठ परीक्षा अर्ज प्रक्रिया आजपासून

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातर्फे नोव्हेंबरमध्ये हिवाळी सत्रातील परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्यातील विधी, शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवार (ता. १८) पासून सुरू होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
18 OCT 2024
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठीचा अभिजात दर्जा टिकवावा

## डॉ. तारा भवाळकर : मराठी शिक्षक संघातर्फे सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती रुजविण्याची आणि संवर्धन करण्याची जबाबदारी ही तरुण पिढीवर आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, परंतु हा मिळालेला दर्जा टिकविण्यासाठी तौलनिक संशोधनाच्या माध्यमातून आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे', असे मत डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वतीने डॉ. तारा भवाळकर यांचा सत्कार करण्यात आला.

दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका प्रा. डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाल्याने शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

संघाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश दुकळे यांनी स्वागत केले. यावेळी अध्यक्ष डॉ. भरत जाधव, सचिव डॉ. मांतेश हिरेमठ यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुभाष पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सविता व्हटकर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. विठ्ठल रोटे उपस्थित होते.

18 OCT 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषेचा दर्जा टिकविण्यासाठी तौलनिक संशोधन आवश्यक

## डॉ. तारा भवाळकर; मराठी शिक्षक संघातर्फे सत्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती रुजवण्याची आणि संवर्धन करण्याची जबाबदारी ही तरुण पिढीवर आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला, ही सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. परंतु, हा मिळालेला दर्जा टिकविण्यासाठी तौलनिक संशोधनाच्या माध्यमातून आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघानी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन डॉ. तारा भवाळकर यांनी केले.

दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. भवाळकर यांचा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाने त्यांच्या घरी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.



**कोल्हापूर : दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल डॉ. तारा भवाळकर यांचा सत्कार करताना शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे पदाधिकारी. (छाया : नाज ट्रेनर)**

संघाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश दुकळे यांनी स्वागत केले. विद्यमान अध्यक्ष डॉ. भरत जाधव म्हणाले की, डॉ. भवाळकर यांनी केलेल्या साहित्य सेवेचा हा मोठा सन्मान आहे. त्यांच्या निवडीने संपूर्ण मराठी साहित्य विश्वामध्ये चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले आहे. सचिव डॉ. मांतेश हिरेमठ यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. सुभाष पाटील यांनी आभार मानले. यावेळी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या सदस्या डॉ. सविता व्हटकर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. विठ्ठल रोटे उपस्थित होते.

18 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मंडलिक महाविद्यालय विजेता

## अंतिम फेरीत डी. आर. माने महाविद्यालयावर मात

सकाळ वृत्तसेवा

मुरगूड, ता. १७ : शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर विभागीय पुरुष गटातील व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धा इचलकरंजी येथील व्यंकटेश महाविद्यालयाच्या संयोजनाखाली पार पडल्या.

मंडलिक महाविद्यालयाने सलग दोन वर्षे उपविजेतेपद पटकाविले होते. यावर्षी विजेतेपदावर शिक्कामोर्तब केला. स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातून १२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाने दूधसाखर महाविद्यालय बिद्री संघाचा उपांत्यपूर्व फेरीत २५-१५, २५-२३ सेटने, उपांत्य फेरीत देवचंद महाविद्यालय अर्जुननगरचा २५-२२, २५-१३ सेटने, तर अंतिम फेरीत डी. आर. माने महाविद्यालय कागल संघाचा २५-२३, २५-१३ अशा सरळ सेटमध्ये एकतर्फी हरवून विजेतेपद पटकाविले.



मुरगूड : येथील विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेतील विजेत्या सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या संघासोबत प्रा. डॉ. शिवाजी पोवार, महादेव कानकेकर, संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे, आदी.

त्यामुळे संघाची निवड मोहनराव पाटील कॉलेज (बोरगाव, जि. सांगली) येथे होणाऱ्या आंतरविभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी झाली आहे.

यशस्वी खेळाडूंमध्ये गजानन गोधडे, ओमकार लोकरे, विवेक चौगले, सागर संकपाळ, सत्यजित शिंदे, विश्वजित रामाने, करण मांगले, जीवन गोधडे, पीयूष साळोखे, करण भोसले, विवेक वाघे आणि सिद्धार्थ मडिलगेकर यांचा समावेश आहे. संघाला प्रशिक्षक महादेव कानकेकर, प्रा. डॉ. शिवाजी पोवार, संभाजी मांगले, श्रावण कळांद्रे, बबलू गोधडे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभारी प्राचार्य शिवाजी होडगे यांचे प्रोत्साहन लाभले.